# अमरावती महानगरपालिका

## शहर बस उपक्रम

## -: टिप्पणी :-

अमरावती शहराची दिवसेंदिवस वाढत असलेली लोकसंख्या ग्रामीण भागातुन रोजगार तसेच दैनंदिन कामा करीता शहरात येणाऱ्यांची संख्या तसेच एस टी महामंडळ तर्फे अनेक वर्षापासुन शहरातील तुरळक मार्गावर सुरु असलेली बस सेवा मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याने एस. टी महामंडळाने बंद करण्याच्या घेतलेल्या निर्णयामुळे शहरातील ॲटो रीक्षा यांची वाढलेली संख्या त्यामुळे उदभवलेली वाहतुक समस्या प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयी अडचणी प्रवास सुरक्षा हया सर्व बाबी लक्षात घेवुन शहरातील नागरीकांना स्वस्त व सुरक्षीत प्रवास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची असल्याने महानगरपालिकेतर्फे अमरावती शहरात शहर बस वाहतुक उपक्रम BOO तत्वावर राबविण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.

अमरावती महानगरपालिकेची आर्थिक स्थिती लक्षात घेता मनपातर्फे हा उपक्रम सुरु करावयाचे झाल्यास उपक्रमातील आवश्यक जवळपास २ कोटी रुपये अनावर्ती भांडवल खर्च व उपक्रमा करीता दर महा होणारा इतर खर्च लक्षात घेता मनपाने स्वत:च्या बळावर हा उपक्रम सुरु करणे शक्य नसल्याने BOO(Bult operate & own) हया तत्वावर अवलंब करुन खाजगी कंत्रटदारामार्फत शहर बस उपक्रम दिनांक २६/२/२००६ ला सुरु करण्यात आलेला आहे. त्या करीता १७ मार्ग निश्चित करण्यात येवुन हया मार्गावरील प्रवाशांची उपलब्धता, मार्गाचे अंतर प्रत्येक फेरी पुर्ण करण्यास लागणारा वेळ , फेऱ्यामधील अंतर, दिवसाला होणाऱ्या प्रत्येक बसच्या फेऱ्याची संख्या त्यानुसार आवश्यक बसेसची संख्या, बसेस खरेदी करीता आवश्यक खर्च त्याकरीता द्यावयाचे कर्ज कर्जाचे हप्ते, वाहनाचा विमा, वाहनाची दुरुस्ती व देखरेख उपक्रमाकरीता आवश्यक कर्मचारी कार्यालयीन खर्च, शासनाकडे भरावा लागणारा आर टी ओ कर प्रवासी कर व इतर कर तिकीटांचे दर उपक्रमाकरीता दर महा अपेक्षीत खर्च व उपक्रमापासून अपेक्षीत उत्पन्न हया सर्व बाबींचा विचार करण्यात येऊन शहर बस चालविण्याकरीता खाजगी अभिर्कता नेमण्याची कार्यवाही निवीदे द्वारे करण्यात आली आहे.

सदर्हु उपक्रम करीता अमरावती मनपाद्वारे कुठल्याही प्रकारचा खर्च करण्यात आलेला नसुन उपक्रमावर संपुर्ण नियंत्रण व देखरेख मनपाची आहे. उपक्रमाकरीता आवश्यक सर्व बसेस अभिकर्त्याद्वारे खरेदी करण्यात येऊन अमरावती महानगपालिकेच्या नावे नोंदी करण्यात आलेल्या आहेत. उपक्रमाद्वारे रॉयल्टी च्या स्वरुपात प्रती कीलोमीटर रु. १.१० पैसे मनपास प्राप्त होत आहे. करारनाम्याची मुदत १० वर्षाकरीता असुन करारनामा संपल्यावर उपक्रमाच्या बसेस अभिकर्त्यास (विनामुल्य) हस्तांतर करण्यात येईल.

महानगरपालिका अमरावती शहर बस वाहतुक उपक्रम हा मे. अंबा माल व प्रवासी सह. संस्था मर्या. अमरावती र. क्र. १११ या अभिकर्त्यामार्फत शासनाच्या टप्पा वाहतुक परवान्याप्रमाणे एकुण ३३ शहर बसेस (४२ सिटर कॅपेसीटी) द्वारे राबविण्यात येतो.

प्रादेशिक परिवहन प्राधिकरण यांचे कडुन मंजुरी प्राप्त १७ मार्गावर एकुण रनिंग कीमी ७७१८.०५ प्रती दिवस (धाव) उपक्रमाच्या बसेस चालवुन महानगरपालिकेला प्रती महा रु २,६३,१८६/- इतके उत्पन्न होत आहे.

शहर बस वाहतुक उपक्रम राबविण्याकरीता वाहनांचे दुरुस्ती देखभाल डिझेल ऑईल इंधन खर्च ,वाहनांचे विमा भरणे, शासकीय कर जसे वाहनांचे फिटनेस बाल कुपोषन प्रवासी अधिभार मनपाची रॉयल्टी भरणे, उपक्रमातील कर्मचारी यांचा पी. एफ भरणे इत्यादीचा भरणा अभिकर्त्याकडुन करण्यात येतो. अभिकर्त्याने आजपर्यंत नियमित भरणा केलेला आहे.

महानगरपालिका अमरावती शहर बस वाहतुक उपक्रमामध्ये एक शहर बस फक्त महीला वर्गाकरीता “महीला बस” म्हणुन चालविल्या जाते त्यामध्ये वाहक(कंडक्टर) कर्मचारी महीला सुध्दा ठेवण्यात आलेल्या आहेत.

महानगरपालिका अमरावती शहर बस उपक्रमाचे सर्वात जास्त विद्यार्थी वर्ग हा प्रवासी असल्याने विद्यार्थी वर्गाला प्रवास शुल्कामध्ये सवलत देऊन त्यांना मासीक पासेस देण्यात येतात.

दररोज शहर बस प्रवास करणारे वर्गाला सुध्दा प्रवास शुल्कात सवलत देऊन पासेस देण्यात येतात. अंध लोकांना (पांढरी काठी) प्रवास शुल्कात ७० टक्के सुट देण्यात येते.

**शहर बस उपक्रमाबाबत ठळक माहीती**

| | |
|---|---|
| १. प्रस्तावित मार्गाची संख्या | एकुण १७ मार्ग |
| २. १७ मार्गाकरीता बसेस संख्या | ३३ बसेस |
| ३. १७ मार्गाचे दरदिवशी होणारे एकुण कि. मीटर | ७७१८.०५ |
| ४. रॉयल्टीचा दर | रु १.१० पैसे /प्रती कीमीटर |
| ५. मनपास प्रतीमहा मिळणारी रॉयल्टी | रु २,६३,१८६/- ३० दिवसा करीता |
| ६. शासनास कर रुपाने होणारी प्राप्त रक्कम | अंदाजे ३ लाख प्रतीमहा |

७. महानगरपालिकेचा कुठलाही खर्च झालेला नाही.

तत्वताः महानगरपालिकेने शहरातील शहर बस वाहतुक अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने तसेच उपक्रमातील शहर बसेसची संख्या कमी पडत असल्याने शहर बस वाहतुक उपक्रम प्रभावी तथा सुरळीत शहरातील सर्व मार्गांवर सुरु करण्याच्या दृष्टीने तोडगा काढण्याकरीता, शासकीय योजना **जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिनीव्हल मिशन Jn NURAM** ह्या योजनेचा अभ्यास करून. सदर शासकीय योजने मधून शहर बस वाहतुकी करीता लागणाऱ्या कमी पडत असलेल्या बसेस मिळविण्याकरीता (६४ बसेसचा) Detail Project Report **D.P.R.** तयार करून महाराष्ट्र शासनाकडे बसेस मिळण्याकरीता दिनांक १८/११/२०१३ रोजी सादर केला.

महाराष्ट्र शासनाने सदर उपक्रमाच्या (६४ बसेस) उपलब्ध करून देण्याकरीता दिनांक १६/०१/२०१४ रोजी मुंबई येथे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची बैठक घेवून D.P.R. ची तपासणी करून, त्यास मंजुरी प्रदान केली. व प्रकरण पुढील मंजुरी करीता केंद्र शासनाकडे दिल्ली येथे पाठविला.

नवी दिल्ली येथे दिनांक २०/०२/२०१४ रोजी मिनिस्ट्री ऑफ अर्बन डेव्हल्पमेंट निर्माण भवन नवी दिल्ली येथे **Jn NURAM** योजने मधुन ६४ बसेस उपलब्ध करून देण्याकरीता बैठक होऊन, त्यामध्ये D.P.R. तपासणी करून, **जवाहरलाल नेहरू नॅशनल अर्बन रिनीव्हल मिशन Jn NURAM** योजने मधुन ६४ बसेस अमरावती महानगर पालिका अमरावती देण्याचे निश्चित करण्यात आले.
असुन महानगरपालिका लवकरात लवकर बसेस प्राप्त करण्याच्या प्रयत्नात आहे.